**४.** मी शपथपत्र वाचले आहे. त्यातील मजकूर खरा आहे. त्यावर माझी सही आहे.

**<u>पुढील सरतपासणी प्रारंभ ॲड.श्री. तेलगोटे यांचेमार्फत शपथेवर सुरु</u>**

५. मी यादी नि.यु-२१ सोबत इयत्ता चवथी ते आठवी पर्यंतच्या वार्षिक प्रगती अहवालांच्या प्रती दाखल केल्या. न्यायालयाने त्या मुळ कागदपत्रांशी पडताळून पाहिल्या आहेत. त्यांना एकत्रितपणे नि.यु-३४ देण्यात येते.

**<u>तक्रारदाराची उलटतपासणी उत्तरवादीचे विधिज्ञ श्री शहाणे यांचे मार्फत सुरु</u>**

६. मला न्यायालयामार्फत साक्ष समन्स प्राप्त झालेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की न्यायालयात मी तक्रारदाराच्या सांगण्याप्रमाणे साक्ष देण्यास आलो आहे. माझे शिक्षण वाड्मय स्नातक पर्यंत झालेले आहे. मी छायाचित्रण व्यवसाय करतो. मी माझ्या स्आुडीओच्या अनुज्ञप्तीची (परवान्याची)प्रत दाखल केलेली नाही. मी शपथपत्रात नमूद केलेला माझा पत्ता बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की तक्रारदार ही सुद्धा न्यायनगर गल्ली क्र.११ येथेच रहाते. हे म्हणणे खरे आहे की आम्ही दोघे एकाच परिसरात रहातो.

७. मी उत्तरवादी क्र.१ शाळेत इयत्ता आठवीपर्यंत शिक्षण घेतलेले आहे. मी इयत्ता चवथी २००४ मध्ये शिकत होतो. मी इयत्ता आठवीमध्ये कोणत्या साली शिक्षण घेतले ते मला सांगता येणार नाही. मी इयत्ता चवथीत शिक्षण घेत असतांना तक्रारदाराला किती पगार मिळत असेल हे मला आता सांगता येणार नाही. मला तक्रारदाराच्या पगाराबदद्ल कोणतिही कल्पना किंवा माहिती नाही. तक्रारदार ही किलबिल बालक मंदीरात शिपाई पदावर प्रथम काम करु लागली होती. तिची नियुक्ती कशा प्रकारे झाली हे मला सांगता येणार नाही. मला हे सांगता येणार नाही

उत्तरवादींनी तिची मुलाखत घेतली होती काय किंवा तिने नोकरीसाठी लेखी अर्ज केला होता काय. तक्रारदाराने ही तक्रार तिची नोकरी शासनाव्दारे मान्य करुन घेण्यासाठी दाखल केली आहे.

८. मला हे माहित नाही की उत्तरवादीकडे शासन मान्यता प्राप्त कोणीही कर्मचारी कार्यरत नाही. मला हे देखिल माहित नाही की उत्तरवादीकडे काही रिक्त पदे आहेत काय? मला हे सुध्दा माहित नाही की शासनाचे नियम उत्तरवादीला लागू आहेत काय? हे मी सांगू शकतो की तक्रार दाखल झाल्याचे दिनांकापासून आजपर्यतच्या तारखेपर्यंत तक्रारदार उत्तरवादी यांच्याकडे सलगपणे काम करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की तक्रारदार ही उत्तरवादीकडे इमाने इतबारे काम करीत होती. हे म्हणणे खरे नाही की तक्रारदार मेहनती व मायाळू असल्याबाबत मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की तक्रारदाराचे काम समाधानकारक नाही. हे म्हणणे खरे नाही की तक्रारदार ही कामाची टाळाटाळ करते व वरिष्ठांशी उद्धट वर्तन करते. हे म्हणणे खरे नाही की तक्रारदार ही १५ ऑगस्ट व २५ जानेवारी रोजी झेंडावंदनाची तयारी करीत असे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी व तक्रारदार एकाच भागात रहात असल्यामुळे मी तिच्यासांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे शपथपत्र दाखल केले आहे.

उलटतपासणी पुर्ण

फेरतपासणी नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती

**समक्ष**

**सही**

**( श्री.एस.एस.मौदेकर )**
**सदस्य,**
**औद्योगिक न्यायालय, औरंगाबाद**

**दिनांक : १५.१०.२०२४**
**ठिकाण: औरंगाबाद**